
Government of
Maharashtra
Department of Industries



# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

# 1 :- संकेतस्थळ

## अ) वापरण्यातील सुलभता (User Friendly) :




▪**सुलभ नेव्हिगेशन** (Easy Navigation): Link: www.midcindia.org
मुख्य पानावर वेगवेगळ्या सेवा आणि विभागांची स्पष्टपणे मांडणी करण्यात आली आहे.

▪**बहुभाषिक आधार** (Multilingual Support):
मराठी आणि इंग्रजी भाषेत वेबसाइट उपलब्ध आहे, त्यामुळे नागरिक आणि उद्योजकांना माहिती सहज मिळते.

▪**प्रतिसादक्षम डिझाइन** (Responsive Design):
संकेतस्थळ मोबाईल, टॅबलेट आणि संगणकावर सुसंगतरित्या चालते, त्यामुळे कोणत्याही उपकरणावर सहज वापर करता येतो.




## आ) माहितीचे अद्यावतीकरण (Update Information) :

➤नवीन धोरणे, प्रकल्प आणि सरकारी निर्णय वेळोवेळी वेबसाइटवर अद्यावत केले जातात.

➤औद्योगिक भूखंडांचे वितरण, नवीन योजनांची माहिती आणि निविदा सूचना यांची माहिती नियमित प्रकाशित केली जाते.

➤महामंडळाद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध परवान्यांची माहिती व अर्ज प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती अद्यावत केली जाते.

➤विविध विभागांचे अधिकारी आणि त्यांचे संपर्क क्रमांक वेळोवेळी अद्यावत केले जातात.

# 1 :- संकेतस्थळ

## इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण (Proactive Disclosure under RTI Act) :

- मऔवि महामंडळाच्या विविध विभागांची भूमिका, जबाबदाऱ्या आणि अधिकारी यांची माहिती उपलब्ध आहे.
- औद्योगिक विकासाशी संबंधित कायदे, धोरणे आणि नियम सार्वजनिकरित्या उपलब्ध करून दिले जातात.




## ई) सुरक्षितिता (data /Cyber Security) :

- MIDC संकेतस्थळाच्या सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षणासाठी विविध तांत्रिक उपाययोजना केलेल्या आहेत. (HTTPS प्रोटोकॉल, SSL Certificates, WAF, वार्षिक सुरक्षा ऑडिट, डेटा बॅकअप आणि पुनर्प्राप्ती)




## उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिध्द करणे :

- महामंडळाने आतापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत विविध प्रकाराच्या 10 सेवा अधिसुचित केलेल्या असून इतर 9 सेवा लागू करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

# 2:- केंद्र शासनाशी सुसंवाद

अ) राज्याच्या विकासाशी संबंधित केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव व विधेयकांचा पाठपुरावा करून पूर्तता करणे:

आ ) राज्यासाठी केंद्रीय योजनांचा दिलेला लक्षांक पूर्ण करणे.

इ) केंद्रीय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्राप्त करून घेणे, तसेच राज्याचा निधी अर्थसंकल्पीत करून वितरीत करून घेणे.

| प्रकल्प | | | शेरा |
|---|---|---|---|
| १. इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर-२.०, रांजणगांव, पुणे औद्योगिक क्षेत्र: रांजणगाव टप्पा क्र. ३ | क्षेत्रफळ | 297.11 एकर | ❖ प्रथम हफ्त्याचा निधी : 62.39 कोटी प्राप्त<br>❖ दुस-या हफ्त्याचा निधी : 83.19 कोटी अप्राप्त.<br>❖ उर्वरित निधी प्राप्त करण्यासाठी महामंडळामार्फत दिनांक 03/12/2024 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे व त्यानंतर अनुक्रमे 04/12/2024, 21/01/2025, 11/02/2025, 18/02/2025, 25/02/2025, 19/03/2025, 25/03/2025, 27/03/2025 व 11/04/2025 रोजीच्या ईमेलद्वारे विनंती केलेली आहे. |
| | प्रस्तावित किमत | 492.85 कोटी | |
| | मंजूर निधी | 207.98 कोटी | |
| २. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क अमरावती औद्योगिक क्षेत्र: नांदगाव पेठ, अमरावती | क्षेत्रफळ | 1013 एकर | ❖ पायाभूत सुविधांच्या कामांकरीता रु. 111.76 कोटी रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या असून माहे 2025 सप्टेंबर पर्यन्त कामे पूर्ण होतील.<br>❖ गुंतवणूकदारांसोबत 1370 कोटी रुपयांचे 5 सामंजस्य करार करण्यात आले आहेत.<br>❖ या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी मंजुर करण्यासाठी दिनांक 17/01/2025, 05/02/2025, 26/04/2025, 29/04/2025 रोजीच्या ईमेलद्वारे प्रकल्प अहवाल सादर करण्यात आलेला आहे.<br>❖ रोजगार निर्मिती: अंदाजे 5000 |
| | प्रस्तावित किमत | 50,000 कोटी | |
| | मंजूर निधी | 200 कोटी (अप्राप्त ) | |

| प्रकल्प | | | शेरा |
|---|---|---|---|
| **3. मेगा लेदर फुटवेअर असोसिएशन क्लस्टर डेव्हलपमेंट ( MLFACD ) औद्योगिक क्षेत्र : रातवड, ता. मांणगाव, रायगड** | क्षेत्रफळ | 151 एकर | ➢28 जून 2023 रोजी केंद्र सरकारने प्रकल्पाला मान्यता दिली.<br>➢पायाभूत सुविधांची कामे प्रगतिपथावर आहेत. या अनुषंगाने महामंडळाने अर्ध शासकीय पत्र क्र.पी403103, दि.03/02/2025 व ई-मेल दि. 05/02/2025, 21/02/2025, 11/03/2025, 07/04/2025, अन्वये रू. 125 कोटी मंजुर अनुदानापैकी पहिला हप्ता रू. 31.25 कोटीच्या मंजुरीकरीता पत्रव्यवहार करण्यात आला आहे. |
| | प्रस्तावित किमत | 323.77 कोटी | |
| | मंजूर निधी | 125 कोटी (अप्राप्त ) | |

## ई) केंद्र शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळीच कार्यवाही करून अनुपालन सादर करणे.

| अ.क्र. | केंद्र शासनाच्या कार्यालयाचे नाव | विषय | भूखंड वाटप केलेले औद्योगिक क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1. | कर्मचारी राज्य बीमा निगम (श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार) | ईएसआयसी रूग्णालय व कामगार भवनकरीता जागा मिळणेबाबत. | **ईएसआयसी रूग्णालय:-** चाकण टप्पा क्र. 2, जळगाव, अति. अमरावती, वर्धा, सातारा व बारामती |
| 2. | | | **कामगार भवन:-** रत्नागिरी, पिंपरी, सांगली (मिरज), चिंचोली व अति. धुळे |

➢केंद्र शासनाच्या विविध विभागाकडून एकूण 7 पत्रे पणन विभागास प्राप्त झाली असून कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

# 3 स्वच्छता

## अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण :-

➢महामंडळामार्फत सर्व जुन्या दस्तऐवज/अभिलेखांचे वर्गीकरण करण्यात आलेले असून, वर्गीकरण केलेल्या अभिलेखांचे माहे जानेवारी, 2025 पासून एकुण गठ्ठे 143 व एकुण संचिका 1539 असे निंदणीकरण करण्यात आलेले आहे.

## आ) मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे:-

अभिलेखाचे वर्गीकरण केल्यानंतर ज्या अभिलेखांची भविष्यात आवश्यकता भासणार नाही अशा सर्व मुदतबाह्य 779 अभिलेख नष्ट करण्यात आले आहेत.

## इ) जड वस्तू संग्रह नोंदवही:-

जड वस्तू संग्रह नोंदवही याची नोंद विभागीय स्तरावर वेळोवेळी अद्यावत करण्यात येते. सद्यस्थितीत मऔविम मुख्यालयात सोफा, कपाटे, टेबल, खुर्च्या, संगणक, प्रिंटर इत्यादी जड वस्तुंची संख्या 1248 इतकी आहे.

## ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट:-

सद्यस्थितीत 136 जुन्या खुर्च्या, 4 टेबल्स या वस्तुंचे निर्लेखन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

## उ) जुन्या वाहनांचे निर्लेखन:-

सद्यस्थितीत 3 जुन्या वाहनांचे निर्लेखन करण्यास परवानगी देण्यात आलेली असून, निविदा प्रक्रिया सुरू आहे.



Before



After

मऔविम मुख्यालय अभियांत्रिकी विभागातील फाईल कॉम्पॅक्टर





Before



After

मऔविम मुख्यालय अभियांत्रिकी विभागातील फाईलींचे निंदणीकरण व वर्गीकरण

# 3 स्वच्छता




**Before** मऔविम मुख्यालय सामान्य प्रशासन विभाग **After**





**Before** मऔविम मुख्यालय स्तर क्र. १ अभ्यागत बैठक व्यवस्था **After**







# 4 :- तक्रार निवारण

<table>
<tr><th>मुद्दे</th><th>एकूण प्राप्त तक्रारी</th><th>निकाली काढण्यात आलेल्या तक्रारी</th></tr>
<tr><td>अ) आपले सुरकार पोर्टलवरील तक्रारींचे निवारण<br>( दिनांक 1 एप्रिल, 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे )</td><td>651</td><td>651<br>(टक्केवारी 100 %)</td></tr>
<tr><td>आ) पी.जी.पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण<br>( दिनांक 1 एप्रिल, 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे )</td><td>57</td><td>57<br>(टक्केवारी 100 %)</td></tr>
<tr><td>इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी</td><td colspan="2">


</td></tr>
<tr><td>ई) लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण</td><td colspan="2">लोकशाही दिनाचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजन केले जाते. सदर कार्यक्रमामध्ये संबंधित प्रादेशिक कार्यालयातील अधिकारी सहभागी होत असतात.</td></tr>
</table>

# 5 कार्यालयीन सोई सुविधा

## अ) कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था:-

✓महामंडळाच्या विविध कार्यालयामध्ये तसेच ठिकठिकाणी विभाग प्रमुखांच्या कार्यालयांमध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.





## आ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था:-

✓महामंडळाच्या कार्यालयामध्ये 17 पुरूष तसेच 15 महिला प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रसाधनगृहाची दैनंदिन साफसफाई करण्यात येत असून, नादुरुस्त प्रसाधन गृहांची आवश्यकतेनुसार तातडीने दुरुस्ती करण्यात येते.



## इ) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था:-

✓महामंडळाच्या कार्यालयामध्ये अभ्यागतांसाठी आवश्यकतेनुसार मुख्य प्रतिक्षालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, संबंधित विभागप्रमुख यांच्या कार्यालयामध्येही प्रतिक्षालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, अभ्यागतासाठी मोबाईल चार्जिंग सुविधा देण्यात आलेली आहे.

## ई) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे:-

✓महामंडळाच्या कार्यालयामध्ये एक मुख्य नामफलक व ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार दिशादर्शक फलक बसविण्यात आले आहेत.

## उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरण:-

✓महामंडळाच्या कार्यालयामध्ये वातावरण प्रसन्न राहण्याकरीता दैनंदिन साफसफाई करण्यात येते व पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात आलेली आहे. आवश्यकतेनुसार सौंदर्यीकरण करण्यात आले आहे.

# 5 कार्यालयीन सोई सुविधा



मुख्यालय येथील व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा



मुख्यालय येथील अधिकारी / कर्मचारी /अभ्यागताकरीता उपहारगृह व्यवस्था



मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनाबाहेर अभ्यागतासकरीता प्रतिक्षालय



मुख्यालय येथील अधिकारी / कर्मचारी /अभ्यागताकरीता कॅन्टीन व्यवस्था

# 6 :- कामकाजातील सुधारणा

## अ) ई-ऑफीस प्रणालीत 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे

महामंडळाने **15** मे **2023** पासून ई-ऑफिस प्रणालीमार्फत वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव सादर करण्याचे धोरण स्विकारलेले आहे. त्याअनुषंगाने भूखंड/ शेड/ गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ इत्यादी बाबतीत निर्णयाचे विकेंद्रीकरण केल्यामुळे **4** किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर प्रकरणांचा निपटारा केला जातो.

## आ) ई-ऑफीसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी (%)

| | | |
|---|---|---|
| एकूण **2342** नस्त्या | निकाली **118** | (टक्केवारी **5%**) |

## इ) वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत स्टष्टीकरण /खुलासा वेळीच प्रसिध्द करणे

महामंडळामध्ये स्वतंत्र जनसंपर्क विभाग असून त्याअंतर्गत महामंडळासंबंधित बातम्यांचा वस्तुस्थितीदर्शक खुलासा संबंधीत विभागाकडून/ कार्यालयाकडून प्राप्त करून शासनामार्फत प्रसिध्दी माध्यमांकडे वेळोवेळी जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दीस देण्यात येतो.

## इ) Ease of Living अंतर्गत विभागातील सेवांचे सुलभिकरण करणे.

महाराष्ट्रात व्यावसायिक सुविधा सुधारण्यासाठी, MIDC ने खालील सुधारणा अमलात आणल्या आहेत –

**ऑनलाइन सिंगल विंडो प्रणाली** तयार केली आहे, ज्यामुळे MIDC ग्राहकांना सर्व सेवा ऑनलाइन मिळवता येतात. याकरीता महामंडळाने SWC मार्फत विविध सेवांकरीता कालमर्यादा दिलेली आहे. उदा. भूखंड हस्तांतरण व मुदतवाढीसाठी 30 दिवस, पोटभाडेकरू मंजूरीकरीता 8 दिवस इत्यादी.

- **युनिफाईड बँकिंग प्रणाली**द्वारे ऑनलाइन पेमेंट प्रक्रिया लागू केली आहे.
- **विभागाद्वारे विचारलेली प्रश्न व त्यांचे ग्राहकांद्वारे उत्तर** देखील पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने दिले जात आहेत.
- **महामंळाच्या भूखंडांचे वाटप शासनाच्या** (NIC) MahaTenders पोर्टलद्वारे पारदर्शक पद्धतीने केले जात आहे.

**Single Window Clearance**




**Mahatenders Portal**



# 7 :- अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर ( AI )

## अ) नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे:

मऔविम अधिकारी/ कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती) विनियम 2012 मधील तरतुदीनुसार महामंडळामध्ये सरळसेवा भरती तसेच अनुकंपा तत्वावरील नियुक्त अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधी मध्ये प्रशिक्षण देण्यात येते. सामान्य प्रशासन विभागांतर्गत सन 2024-2025 मध्ये **15** अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण दिलेले आहे.

## आ) सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे :

महामंडळातील वर्ग 1 ते वर्ग 3 संवर्गातील एकूण **2077** अधिकारी/ कर्मचारी यांचे सन 2024-2025 या कालावधीचे गोपनीय अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच गोपनीय अहवालाचे कोरे फॉर्म्स सर्व कार्यालयांना पाठविण्यात आले आहेत.

## इ) सेवा ज्येष्ठता याद्या प्रसिध्द करणे व पदोन्नत्या करणे :

सामान्य प्रशासन, लेखा व वित्त, नियोजन, अग्निशमन व अभियांत्रिकी विभागातील एकूण 78 सवंर्गाची जेष्ठता यादी दिनांक 22.03.2025 व 21.04.2025 रोजी प्रसिध्द केलेली आहे. महामंडळामार्फत 75 कर्मचा-यांच्या पदोन्नत्या करण्यात आलेल्या आहेत व 271 जणांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे.

## ई) न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे.

| एकूण विभागीय चौकशीची प्रकरणे | विभागीय चौकशी पुर्ण झालेली प्रकरणे | विभागीय चौकशी प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|
| 25 | 19 | 06 |

| एकूण सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणे | निकाली काढण्यात आलेली प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|
| 01 | 0 | 01 |

| एकूण उच्च न्यायालयातील प्रकरणे | निकाली काढण्यात आलेली प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|
| 34 | 01 | 33 |

## उ) कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरू करणे.

MIDC सध्या स्मार्ट गव्हर्नन्स प्रोजेक्ट लागू करत आहे, ज्याचा उद्देश सध्या स्वतंत्रपणे कार्यरत असलेल्या विविध प्रणालींना एकत्र करणे आणि त्यामध्ये नवीन सुविधा समाविष्ट करणे हा आहे. या प्रकल्पांतर्गत, MIDC कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सक्षम चॅटबॉट विकसित करण्याचे नियोजन करत आहे, जो ग्राहक आणि कर्मचारी यांना MIDC संदर्भातील माहिती सुलभ आणि वापरकर्त्यांसाठी सोयीस्कर पद्धतीने मिळवण्यासाठी मदत करेल.

# ८ :- आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

## अ) गुंतवणूदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे.

### भूखंड / शेड / गाळा वाटप :-

- महामंडळाचे सर्व प्रकारच्या भूखंडांचे वाटप Land Allotment Portal वर ऑनलाईन अर्ज स्विकारून प्राधान्याने भूखंडांचे वाटप केले जाते.
- भूखंडांच्या जाहिराती प्रसिध्द करून NIC च्या Mahatenders द्वारे प्राप्त झालेल्या निविदाधारकांना भूखंडांचे वाटप केले जाते.

### पायाभूत सुविधा विकास :-

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) प्रस्तावित उद्योगांसाठी मुलभूत पायाभूत सुविधा पुरविलेल्या विकसित भूखंडांचे वाटप वाजवी दराने केले जाते.
- बांधकाम परवानगी, अग्निशमन नाहरकत पत्र यांसारख्या सर्व परवानग्या एक खिडकी प्रणालीद्वारे (SWC) विशिष्ट कालमर्यादेत दिल्या जातात.

### मैत्री पोर्टल :-

- उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी मैत्री पोर्टल मार्फत महिन्यातून एक ते दोन वेळा बैठका घेऊन उद्योजक, महामंडळाचे व उद्योग संचलनालयाचे सक्षम अधिकारी यांच्या उपस्थितीत समस्यांचे तातडीने निराकरण केले जाते.

### तक्रार निवारण Grievances:-

- शासनाच्या आपले सरकार, पीएम पोर्टल, शासन संदर्भ, MIDC Grievances Portal मार्फत तक्रारदारांच्या / उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करून त्याचा अहवाल शासनास सादर केला जातो.
- केलेल्या कार्यवाहीचा महामंडळाच्या सक्षम अधिका-यांमार्फत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

## क्षेत्रनिहाय पायाभूत सुविधा विकास (PM MITRA, BDP, EMC)

मऔवि महामंडळाद्वारे वस्त्रउद्योग (पीएम मित्रा), बल्क ड्रग पार्क (BDP) व इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (EMC) यांसारख्या विशेष क्लस्टर करीता पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

## कंट्री डेस्क — परदेशी गुंतवणुकीसाठी देशनिहाय संपर्क:

मऔवि महामंडळाकडून परदेशी गुंतवणूकदारांशी समन्वय साधण्यासाठी देशनिहाय कंट्री डेस्कची स्थापना केली गेली आहे, जी परराष्ट्र दूतावास, व्यापार संघटना व गुंतवणूक प्रतिनिधी मंडळांशी संवाद साधून गुंतवणूक वाढविण्यास मदत करते.

## प्रमुख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, हॅनोव्हर मॅसे, व्हायब्रंट गुजरात यांसारख्या जागतिक मंचांवर मऔवि महामंडळाद्वारे महाराष्ट्राचे सशक्त प्रतिनिधित्व करून गुंतवणूक आकर्षित केली जाते.

## गुंतवणूक प्रोत्साहन — विशेष सल्लागारांची नेमणूक:

- MIDC कडून क्षेत्रविशेष व भौगोलिक दृष्टिकोनातून गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागारांची नियुक्ती करण्यात येते.
- हे सल्लागार गुंतवणूक संधींचा शोध, मार्गदर्शन व विपणन क्रिया सुसंगत रीतीने पार पाडतात.

## आ) व्यापारी / कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार सर्व कार्यासन अधिकारी त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक कार्यालयांना प्रत्येक गुरूवार व शुक्रवार या दिवशी भेटी देऊन कार्यालयीन कामाचा निपटारा आणि व्यापारी / कामगार वर्गाच्या संघटनांनी उपस्थित केलेल्या समस्या / अडचणींचे निवारण करण्यात येते.



उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध : डॉ. शिवाजी पाटील

गळोची : पुढारी वृत्तसेवा

बारामती एमआयडीसीमधील उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवाजी पाटील यांनी सांगितले.

पाटील यांनी गुरुवारी (दि. २) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या बारामती विभागीय कार्यालयास भेट दिली, त्या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी विभागीय अध्यक्ष शरद सूर्यवंशी, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी सचिन बारवकर, अधीक्षक अभियंता नीलेश मोडवे, कार्यकारी अभियंता विजय पेटकर, उपरचनाकार महेश पाचपुते, उपअभियंता दत्तात्रय गलांडे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे बारामती विभागाचे उपाध्यक्ष शिवाजी-राव निंबाळकर, सुशीलकुमार सोमाणी, संचालक मनोज तुपे, सुरेश परकाळे, उद्योजक अजय इंगवले आदी उपस्थित होते.

बारामती एमआयडीसीमधील दोन्ही फेजमधील रस्ता, वीज, पाणी व इतर तांत्रिक समस्या, कटफळ चौक येथील वाहतूक समस्या, पर्यावरणाच्या दृष्टीने कंपनी आवारातील झाडे आदीबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. उद्योजकांना पोषक वातावरणामध्ये कंपनी चालविण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही डॉ. पाटील यांनी या वेळी दिली.

डॉ. शिवाजी पाटील यांच्यासमवेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी.

पुढारी ANCHOR






## इ) गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे –

मैत्री पोर्टल मार्फत उद्योगसंचनालय विभागामार्फत महिन्यातून एक ते दोन वेळा बैठकांचे आयोजन केले जाते. सदर बैठकांमध्ये तक्रारदारांच्या समस्या सोडविण्यासाठी महामंडळाचे सक्षम अधिकारी, उद्योजक व उद्योग विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत आभासी बैठका (Through VC) घेतल्या जातात.

## ई) गुंतवणूदार उद्योजकांसाठी प्रक्रीयेचे सुलभिकरण करणे:-

- उद्योजकांची कामे वेळेत होण्यासाठी महामंडळाने धोरण निश्चित करून अधिकारांचे विकेंद्रीकरण केले आहे.
- महामंडळाने उद्योजकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी SWC पोर्टल सुरू केले आहे. उद्योजक अर्ज करून सेवा मिळवतात आणि अर्जावर कार्यवाही करण्यासाठी एक निश्चित कालमर्यादा ठरविण्यात आली आहे. यासंदर्भात सर्व अभियांत्रिकी व प्रादेशिक कार्यालयांची नियमित आढावा बैठक आयोजित करण्यात येते.



# 9 :- नाविन्यपूर्ण उपक्रम 1- सुकर जीवनमान

## अ) नागरी सेवांचे सुलभीकरण ( किमान 2 सेवा ) ( पुर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक )

| अ.क्र. | पूर्वी | आता |
|---|---|---|
| 1. | MAITRI Protal आणि MIDC SWC Portal यांचे Integration प्रस्तावित होते. | उद्योजकांना महामंडळाच्या लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अंतर्गत अधिसुचित सेवा अधिक सुलभतेने मिळण्याकरीता MIDC SWC **पोर्टल आणि** MAITRI **2.0** (State Single Window) यांचे integration करण्यात आले आहे. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसह इतर सेवा **संकेतस्थळावर ऑनलाईन** उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत |
| 2. | महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार e-tendering पध्दतीने भूखंडांचे वाटप Softech या खाजगी कंपनीच्या सॉफ्टवेअरमधून करण्यात येत होते. | Mahatenders:-निविदा प्रक्रीयेतील गोपनीय माहितीची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि अधिक निकोप स्पर्धा होण्याकरीता सर्व प्रकारच्या निविदांकरीता महाराष्ट्र शासनाच्या NIC यांनी विकसित केलेली. Mahatenders चा नव्याने वापर सुरु करण्यात आला आहे. |

MAGNETIC MAHARASHTRA

# 10 :- नाविन्यपूर्ण उपक्रम 2- सुकर जीवनमान

Government of Maharashtra

MIDC


## अ) विभागामध्ये कार्यालयीन व्यवस्थापनात २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे :


### 1. स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest)

- भूसंपादनासाठी प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी उद्योजकांची जागेची/ भूखंडाची मागणी तपासणेसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Intrest) अंतर्गत उद्योजकांकडून प्रस्ताव मागविणेची कार्यवाही सुरू.
- स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) नुसार भूसंपादनासाठी प्रस्तावित क्षेत्र औद्योगिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या सुसाध्य (Financial Feasible) आहे की नाही हे तपासणे शक्य होत आहे.

### 2. भूमी उपयुक्तता मॉड्यूल (Land Suitability Module):






GatiShakti
State Master Plan -MAHARASHTRA
Dynamic Gap Analyzer
HeatMap
Land Suitability
Site Suitability
Dynamic Alignment
Multi Buffer
Default Map
Print
Railway Track
NOC Applicable
Forest
Eco Sensitive Zone
River Flood Line
Contour
Generate Slope
Contour Selection :
Interval :
Output Style :
Generate
Clear
Report
Generate Slope :
Legend :
Layers
High Resolution Image
Administrative Boundary
Ministry Wise High Impact
Land Use
MDR
Value
Slope (%)
Terminology
Area(Sq.m)
Percentage (%)
0 to 3 %
Gentle slope
3 to 10 %
Moderate Slope
10 to 20 %
Strong Slope
19.59%